# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

## * अर्ज करण्याची पद्धत व निवड प्रक्रीया *

१) उमेदवाराने संपूर्ण माहितीसह अर्ज असोसिएशनच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पत्यावर **रजिस्टर पोस्टाने / कुरिअरने** पाठविण्याचे आहे.

२) महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे कडील दि. २१/०१/२०१९ व दि. २९/११/२०२१. सहकार आयुक्त यांचे कडील दि. २४/०३/२०२२ व १४/०६/२०२२ रोजीचे आदेशान्वये सहकारी बँकांतील नोकर भरती प्रक्रिया शासन नियुक्त संस्थेद्वारेच करणे बंधनकारक आहे.

३) वरील पदांची भरती प्रक्रिया सहकार आयुक्तांचे पॅनेल वरील कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापूर यांचे मार्फत राबविली जाणार आहे.

४) **अर्जाचा नमुना असोसिएशनच्या वेबसाईटवरील नमुन्यात असावा.** उमेदवारांनी अर्जासोबत आपला संपूर्ण बायोडाटा व शैक्षणिक आणि अनुभवाची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

५) **देय मोबदला – प्रशिक्षण कालावधीत ६ महिने रुपये ५०००/-**
**प्रोबेशन कालावधीत २४ महिने रुपये १००००/-**

६) नोकरीचे ठिकाण – **मालेगाव तालुका**

७) लेखी परीक्षा १०० मार्कांची व बहुपर्यायी असणार आहे. गुणानुक्रमे मेरिट नुसार उमेदवाराची निवड केली जाईल. परीक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम साधारण IIBF च्या धरतीवर आधारीत आहे. **परीक्षेचा नमुना पेपर सोबत जोडला आहे. परीक्षेची तारीख, वेळ, ठिकाण व परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास त्याच्या ईमेल आयडीवर पाठविले जाईल. सबब ईमेल आयडी पाठविताना अचूक पाठवावा.** सदर परीक्षेचे आयोजन कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापूर यांचे मार्फत **मालेगाव (नाशिक)** येथे केले जाणार आहे.

८) तोंडी परीक्षेचे आयोजन बँके मार्फत केले जाईल.

९) लेखी परीक्षेसाठी **रु. ६००/-** (जीएसटीसह) या प्रमाणे परीक्षा शुल्क **(विना परतीची)** भरावे लागणार आहे. उमेदवाराने सदरचे परीक्षा शुल्क जाहिरातीमध्ये दिलेल्या अकौंट डिटेल्स वर जमा करावे.

१०) भरलेल्या परीक्षा फी च्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जासोबत जोडावयाची आहे.

११) मागणीनुसार परीक्षा शुल्क न भरल्यास उमेदवारास परीक्षेस बोलविले जाणार नाही.

१२) लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी असोसिएशन व बँकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल. उत्तीर्ण उमेदवारांना मेरीटनुसार प्रत्यक्ष मुलाखतीस बोलविले जाईल.

१३) मुलाखतीमध्ये योग्य ठरणाऱ्या उमेदवारांची बँकेच्या आवश्यकतेनुसार नेमणूक केली जाईल. याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक मंडळाकडे राहतील.

१४) अर्ज करण्याची शेवटची तारीख जाहिरात प्रसिध्द झालेपासून **१० दिवस** राहील.

१५) या संदर्भात अन्य कोणत्याही खुलाशासाठी बँकेच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत असोसिएशन दुरध्वनी क्र. ०२३१-२६२७३०७ वर संपर्क करावा.